

# भारत जोडो यात्रा झिंदाबाद!

**महागाईशी नाते तोडा, भारत जोडा!**
**बेरोजगारीचे जाळे तोडा, भारत जोडा!**
**संविधानासाठी देऊ लढा, भारत जोडा!**

**भारत जोडो यात्रा**



## भारत जोडो यात्रा कशासाठी?

- वाढत्या द्वेषाच्या वातावरणात भारतात प्रेम, एकता व बंधुतेचा संदेश पसरवायला...
- संघ व भाजपच्या आक्रमणामुळे कमजोर झालेल्या न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग, प्रशासन अशा सर्व लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या संस्थांना मजबूत करायला...
- हुकूमशाही व मुस्कटदाबी विरोधात जनतेला निर्भय बनवायला... संविधानावर आधारित नवा भारत घडवायला...
- देशातील जनता बेरोजगारी व महागाईने हैराण झाली आहे. या समस्यांविरोधात लोकांना संघटित करायला...
- उध्वस्त झालेल्या शेतकरी, कामगार आणि छोट्या व्यापाऱ्यांना आशेचा नवीन किरण दाखवायला...
- फक्त मूठभर उद्योगपतींचे 'अच्छे दिन' आणि बाकीच्या गरीब जनतेच्या अतोनात हालअपेष्टा का? हा सवाल विचारायला...

या उद्देशाने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखाली देशातील अनेक सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, लेखक आणि लाखो लोकांनी मिळून 'भारत जोडो यात्रे'चे आयोजन केले आहे.

## बेरोजगारीचे जाळे तोडा, भारत जोडा!

**आज देशात गेल्या 45 वर्षातील सर्वाधिक बेरोजगारी आहे!**

- नोटाबंदी, जीएसटी (वस्तू सेवा कर) आणि कोरोना काळातील अतिशय चुकीच्या व्यवस्थापनामुळे: छोटे-मोठे व्यवसाय बंद पडले; छोटे व्यापारी आणि दुकानदारांच्या धंद्यावर परिणाम झाला; करोडो लोक बेरोजगार झाले.
- मोदी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे शेतीक्षेत्रातील रोजगारांमध्ये प्रचंड घट झाली.
- आज देशात केंद्र आणि राज्यात मिळून जवळपास 60 लाख पदे रिक्त आहेत.
- रेल्वे, सरकारी बँका, विमा कंपन्या आणि इतर सर्व सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करण्यात येत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार संपुष्टात येत आहेत.
- आणि आता '*अग्निपथ*' योजनेद्वारे तरुणांना कंत्राटी सैनिक बनवून नंतर ऐन तारुण्यात बेरोजगार बनवणार आहेत.

## महागाईशी नाते तोडा, भारत जोडा!

मोदी सरकार जीएसटी आणि इतर प्रकारचे कर जनतेवर लादत आहे. भाजप सरकार देशाचे पहिले सरकार आहे ज्याने अन्न-धान्यासोबतच पीठ, पनीर, ताक, दही, गूळ, चिकन, यांसारख्या जीवनावश्यक वस्तुंसोबतच विद्यार्थ्यांच्या साहित्यावरही जीएसटी लावला आहे.

भरमसाठ उत्पादन कर लावल्यामुळे पेट्रोल-डिझेलचे भाव गगनाला भिडलेत. त्यामुळे महागाई प्रचंड वाढली आहे.

| वस्तू | 2014 | 2022 |
|---|---|---|
| गॅस सिलेंडर | 450 रु. | 1050 रु. |
| पेट्रोल | 80 रु. | 106 रु. |
| डिझेल | 62 रु. | 93 रु. |

| वस्तू | 2014 | 2022 |
|---|---|---|
| गहू | 24 रु. | 36 रु. |
| तूर दाळ | 76 रु. | 124 रु. |
| सोयाबिन तेल | 60 रु. | 155 रु. |

## 'हम दो, हमारे दो'चे चक्रव्यूह तोडा, भारत जोडा

का वाढली बेरोजगारी? का वाढवला सरकारने GST? का सिलेंडरावरील अनुदान बंद केलं? का पेट्रोल-डिझेलवर इतका प्रचंड कर लावला? का वाढली महागाई? कारण- मोदी सरकार जनतेसाठी नाही तर काही निवडक उद्योगपतींसाठी देश चालवत आहे.



- मूठभर बड्या उद्योगांवरील **कंपनी कर 30% वरून 22%** केला. परिणामी **दरवर्षी 1.5 लाख कोटींचे नुकसान!**
- गेल्या 8 वर्षात धनदांडग्यांना मोदी सरकारने **44 लाख कोटींची करमाफी आणि 30 लाख कोटींची कर्जमाफी!**
- देशाची साधनसंपत्ती आणि सरकारी उद्योग या मोजक्या देशी-विदेशी कंपन्यांना कवडीमोल भावात विकले जात आहेत.

**म्हणूनच देशातील अब्जाधीशांची संख्या दुप्पट झाली आणि मोदींचे 'मित्र' जगातील सर्वात श्रीमंत लोकांपैकी एक झाले.**

मूठभर उद्योगपतींना एवढी खैरात वाटल्यामुळे सरकाराचे उत्पन्न कमी होत आहे. आणि त्यामुळेच सरकार गरीबांवरील करांचे ओझे वाढवत आहे आणि जनतेवरील खर्च कमी करत आहे. म्हणून महागाई आणि बेरोजगारी दोन्ही वाढत आहेत!

## द्वेष सोडा, भारत जोडा!



बेरोजगारी आणि महागाईमुळे जनतेच्या मनामध्ये भविष्याबद्दल निराशा, भीती, असुरक्षितता निर्माण झाली आहे. या खऱ्या समस्यांपासून लक्ष भरकटवण्यासाठी भाजप आणि रा. स्व. संघ इंग्रजांची 'फोडा आणि राज्य करा' नीती वापरत आहेत. जात, धर्म, भाषेच्या नावावर समाजामध्ये द्वेष पसरवत आहेत. **विविधतेत एकता, सर्वधर्म समभाव, बंधुता हीच आपल्या देशाची खरी ओळख आणि ताकद आहे, हे आपण जाणले पाहिजे.** द्वेषाच्या राजकारणाला बळी न पडता, आपल्या खऱ्या समस्यांबद्दल सत्ताधाऱ्यांना जाब विचारूया, द्वेष पसरवणाऱ्यांना धडा शिकवूया आणि एकजूटीने भारत जोडूया!




## मिले कदम, जुड़े वतन!

बंधु-भगिनींनो, भारत देशाचा आत्मा - देशाचे संविधान आहे. त्यानुसार गेली सत्तर वर्षे देश चालला, देशात शांतता राहिली, त्यामुळे देशाचा विकास झाला. आज मात्र ह्या आत्म्यावरच घाव घातला जात आहे. ज्या लोकांनी स्वातंत्र्य चळवळीशी गद्दारी केली, ज्यांनी भारतीय संविधान आणि तिरंग्याला विरोध केला, आज त्याच विचारधारेचे लोक सत्तेमध्ये आहेत. उघडपणे संविधानाच्या मूल्यांवर हल्ला बोलत आहेत. संविधानातील न्याय, समता, बंधुता या तत्वांना तीलांजली तर दिली जात आहेच पण संविधानालाच अस्तित्वहिन करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

आपण सर्वजण भारतीय संविधानाचे रक्षण करण्यासाठी सज्ज होऊ, निराश जनतेमध्ये आशेचा किरण जागवू, लोकांना निर्भय बनवू आणि देशातील सर्व जाती-धर्माच्या लोकांची मने जोडू तेव्हाच खऱ्या अर्थाने भारतही जोडला जाईल.

**चला तर मग, आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी, संविधानावर आधारित देश साकारण्यासाठी, भारताला पुन्हा एकदा विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी एकत्र येवूया...**

**एकजूटीने भारत जोडूया...**